पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे
यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय
पिंपरी – ४११ ०१८

( मॅन्युअल क्र. २ )

# कार्यालयातील अधिकारी आणि कर्मचारी यांचे अधिकार आणि कर्तव्ये

अधिष्ठाता यांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम ५३ (१) नुसार मा. आयुक्त यांच्या कडील आदेश क्र.प्रशा/१/कावि/१६८६/२०२० दिनांक २८/९/२०२० अन्वये खालील प्रमाणे अधिकार

| अ.क्र. | अधिकारीचे स्वरूप | अधिकार वापरण्याचे कार्यक्षेत्र | विहित कार्यपध्दती |
|---|---|---|---|
| १. | १) वर्ग १ व २ मधील वैद्यकीयअधिका-यांच्या ३० दिवसांपुर्यत अर्जित, विशेष , पुर्णवेतनी परावर्तीत व वैद्यकीय रजा ( क्षयरोग, कुष्ठरोग, पक्षघात, विकलांग , प्रसुती व गर्भपात इ. सह.) मंजुर करणे. | यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय | महाराष्ट्र नागरी सेवा ( रजा ) नियम १९८१ मधील तरतुदीनुसार |
| | २) वर्ग १ व २ मधील वैद्यकीय अधिका-यांकडुन बेशिस्त वर्तनाबाबत नोटीस / ज्ञापन याद्वारे खुलासा मागविणे सक्त ताकीद देणे. | यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय | महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक, शिस्त व अपील) नियम १९८१मधील तरतुदीनुसार |
| | ३) वर्ग १ व २ मधील अधिका-यांच्या नियमित वेतनवाढी मंजुर करणे, सेवानोंद पुस्तकात नोंदी घेणे. | यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय | महाराष्ट्र नागरी सेवा ( वेतन ) नियम १९८१ मधील तरतुदीनुसार |
| | ४) कर्मचा-यांवर प्रशासकीय नियंत्रण ठेवणे | यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय | महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक, शिस्त व अपील) नियम १९८१मधील तरतुदीनुसार |
| | ५) कुटूंब कल्याण कार्यक्रमां अंतर्गत शासन नियमानुसार खाजगी व्यवसायिकांची मुशाहिरा बिले प्रथमत म.न.पा. फंडातून मंजूर करणे व या बिलांची शासनाकडून प्रतिपूर्ती करणे | पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रापुरते मर्यादित | शासनाने दिलेल्या स्थायी आदेशानुसार □ |
| | ६) कुटूब कल्याण विभागाच्या संपूर्ण आस्थापनेचे कामकाज ( पगारबिले, रजा, अनुदान इ.) | पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रापुरते मर्यादित | महाराष्ट्र नागरी सेवानियमातील तरतुदीनुसार. |
| | ७) राष्ट्रीय कार्यक्रम तसेच एड्स नियंत्रण कार्यक्रम, ट्रकर्स, प्रोजेक्ट , क्षयरोग नियंत्रण कार्यक्रम , कुष्ठरोग निवारण कार्यक्रम , हिवताप प्रतिरोध कार्यक्रम साथरोग ( जलजन्य व इतर ) नियंत्रण कार्यक्रम , अंधत्व निवारण कार्यक्रम , शालेय आरोग्य तपासणी कार्यक्रमांतर्गत वर्ग 1 ते ? मधील जबाबदार कर्मचा-यांना ज्ञापन , नोटीसा , सक्त ताकीद देणे व त्यांचेकडून खुलासा मागविणे | नियंत्रणाखाली सोपविण्यात आलेली रुग्णालये, दवाखान्यापुरते मर्यादित | महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणुक, शिस्त व अपील) नियम १९८१ मधील तरतुदीनुसार |
| | ८) राष्ट्रीय कार्यक्रम अंमलबजावणीबाबत कार्यवाही करणे व शासनाकडून प्राप्त होणा-या अनुदानाच्या बिलांची प्रतिपुर्ती / समायोजन करणे , तसेच नागरिकांचे सोईसाठी निरनिराळ्या प्रकारची मोफत आरोग्य विषयक शिबीरे आयोजित करणेस मान्यता देणे , त्याकरीता लागणारे , छपाई साहित्य , पेटींग साहित्य , स्टिकर्स , बॅनर्स , | पिंपरी चिंचवड महापालिका कार्यक्षेत्रापुरते मर्यादित | शासनाने दिलेल्या स्थायी आदेशानुसार व प्रचलित कार्यपध्दती व लेखासंहितानुसार |

| | | | |
|---|---|---|---|
| | वॉलपेंटीग तसेच राष्ट्रीय कार्यक्रमासाठी भाडे तत्वावर घेतलेल्या वाहनांची बिले अदा करणे. | | |
| | ९) शवविच्छेदन गृहाचे आस्थापनाविषयक सर्व कामकाज | नियंत्रणाखाली सोपविण्यात आलेली रुग्णालय,दवाखान्यापुरते मर्यादित | महाराष्ट्र नागरी सेवा नियमानुसार कार्यवाही करावी. |

अधिष्ठाता यांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम ५३ (१) नुसार मा. आयुक्त यांच्या कडील आदेश क्र.प्रशा/१/कावि/१६८६/२०२० दिनांक २८/९/२०२० अन्वये खालील प्रमाणे अधिकार

| अ. क्र. | अधिकारीचे स्वरूप | अधिकार वापरण्याचे कार्यक्षेत्र | विहित कार्यपध्दती |
|---|---|---|---|
| १. | १) आहरण व विवरण अधिकारी म्हणून काम पाहणे (वेतन बीले , फरक बीले , वैद्यकीय बीले, शिलाई बीले अदा करणेचे संदर्भात) | यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयातील सर्व कर्मचा-यांसाठी | लेखा संहितेनुसार व प्रचलित नियमांचे पालन करून कार्यवाही |
| | २) किरकोळ रजा, वैकल्पिक रजा मंजुर करणे. | यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयातील वर्ग १ व २ चे अधिका-यांसाठी | महाराष्ट्र नागरी सेवा रजा नियमातील तरतुदी नुसार कार्यवाही. |
| | ३) वर्ग १, २ व ३ चे अधिका-यांच्या ३० दिवसांपर्यंत व वर्ग ४ मधील कर्मचा-यांच्या त्यापेक्षा जास्त कालावधीच्या अर्जित रजा, सरेंडर रजा मंजुर करणे, क्षयरोग, कुष्ठरोग पक्षघात, विकलांगता,प्रसुती, गर्भपात या सारख्या विशेष रजा तसेच परावर्तीत व अर्धवेतनी रजा मंजुर करणे. | यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयासाठी मर्यादित | महाराष्ट्र नागरी सेवा रजा नियमातील तरतुदी नुसार कार्यवाही |
| | ४) वर्ग ३ व ४ मधील कर्मचा-यांना दक्षतारोध ओलांडणेस मान्यता देणे, वेतननिश्चिती करणे व सेवानोंद पुस्तकात सर्वप्रकारच्या नोंदी घेऊन स्वाक्ष-या करणे. वर्ग ३ मधील कर्मचा-यांच्या नियमीत वेतनवाढी मंजूर करणे. | यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयासाठी मर्यादित | महाराष्ट्र नागरी सेवा वेतन नियम, सेवेच्या सर्वसाधारण शर्ती नियमातील तरतुदीनुसार कार्यवाही |
| | ५) वर्ग ३ व ४ मधील कर्मचा-यांचे विरूध्द ठपका वेतनवाढ रोखून ठेवणे , दक्षता रोध ओलांडून न देणे ( यात पदोन्नती रोखून ठेवणे यांचा समावेश असणार नाही )दंड करणे , ताकीद देणे , कोणत्याही हानीची रक्कम वेतनातुन वसूल करणे इ. | यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयासाठी मर्यादित | मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६( २) पोटकलम (अ) (ब) व (ड) मधील नियम व महाराष्ट्र नागरी सेवा शिस्त व अपील नियमातील विहीत पध्दतीनुसार कार्यवाही. |
| | ६) वैद्यकीय बिलांची प्रतिपुर्ती करणेच्या संदर्भात तांत्रिक तपासणी करून शिफारस करणे , तसेच वैद्यकीय कारणासाठी अग्रीमधनाची शिफारस करणे. | पिंपरी चिंचवड महापालिका सेवेतील सर्व कर्मचा-यांचे बाबतीत | महापालिका सभेने संमत केलेले ठराव व नियमानुसार कार्यवाही |
| | 7) स्वत:चे अग्रीमधन रकमेमधून किरकोळ | यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयासाठी मर्यादित | लेखा संहिता व प्रचलित नियमानुसार कार्यवाही . |

| | | | |
|---|---|---|---|
| | खर्च, पेट्रोल, डिझेल, वाहन दुरूस्ती या पोटी रू.५००/- पर्यंत खर्चाच्या बिलास मंजूरी देणे व स्थायी अग्रीमधन रजिस्टर ठेवणे. | | |

**प्रशासन अधिकारी** यांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ६९(१) नुसार मा. आयुक्त यांचे कडील आदेश क्र. प्रशासन/१/कावि/९२३/१९९६, दि.३१/१०/१९९६ अन्वये खालीलप्रमाणे अधिकार दिलेले आहेत.

| अ.क्र | अधिकारीचे स्वरूप | अधिकार वापरण्याचे कार्यक्षेत्र | विहित कार्यपध्दती |
|---|---|---|---|
| १. | १) वर्ग ४ मधील कर्मचा-यांच्या किरकोळ रजा, ३० दिवसांपर्यंत अथवा त्यापेक्षा जास्त कालावधीच्या अर्जित रजा , सरेंडर रजा, रजा प्रवास भत्यासह मंजूर करणे, क्षयरोग कुष्ठरोग , पक्षघात , विकलांगता , प्रसुती तसेच परावर्तीत रजा व अर्धवेतनी रजा मंजूर करणे. | यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयासाठी मर्यादित | महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम१९८१ व मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५७(३) नुसार कार्यवाही |
| | २) वर्ग ४ मधील कर्मचा-याकडून बेशिस्त वर्तनाबाबत नोटीस , ज्ञापन याद्वारे खुलासा मागविणे , ताकीद देणे. | यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयासाठी मर्यादित | महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियमातील तरतुदीनुसार कार्यवाही. |
| | ३) वर्ग ४ मधील कर्मचा-यांना नियमीत वेतनवाढ मंजूर करणे. ( यामध्ये दक्षता रोध असणार नाही) | यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयासाठी मर्यादित | महाराष्ट्र नागरी सेवा वेतन नियमातील तरतुदीनुसार कार्यवाही. |
| | ४) वर्ग ३ व ४ मधील अधिकारी / कर्मचारी यांचे रजा मंजूरी, वेतनवाढ यासारख्या सर्वप्रकारच्या नोंदी मंजूर आदेशानुसार सेवानोंद पुस्तकात घेणे. | यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयासाठी मर्यादित | महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधरण शर्ती) नियमानुसार कार्यवाही |